केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये लेखाशिर्ष २२१०H०१५, ३१- सहायक अनुदाने (वेतनेत्तर) अंतर्गत अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकातील मुळ तसेच पावसाळी अधिवेशनातील मंजूर पुरक मागणीतील तरतुदीमधून आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांना ऑगस्ट २०२६ ते ऑक्टोबर २०२६ या महिन्याचे मानधन वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्र. पुरमा-३४२६/प्र.क्र.२३०/एनएचएम- संगणक क्र.१६७५१०९
१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक : २० ऑगस्ट, २०२६

वाचा :-

१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. बैठक-०२१९/प्र.क्र.१६९/आरोग्य-७, दिनांक १७ जुलै, २०२०
२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.एनएचएम-११२१/प्र.क्र.६८/२१/आरोग्य-७, दिनांक ०९ सप्टेंबर, २०२१
३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. आशा-५६२२/प्र.क्र.२२६/२१/आरोग्य-७, दिनांक १०, एप्रिल, २०२३
४) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. आशा-५६२३/प्र.क्र.५३५/आरोग्य-७, दिनांक १४ मार्च, २०२४
५) शासन शुध्दीपत्रक, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. आशा-५६२४/प्र.क्र.२२७/आरोग्य-७, दिनांक ३१ जुलै, २०२४
६) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. आशा-५६२३/प्र.क्र.५३५/आरोग्य-७, दिनांक २० सप्टेंबर, २०२४
७) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९.०४.२०२६
८) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. आशा-४९२६/प्र.क्र.१६९/एनएचएम (ई.सं.क्र. १६२८१२९), दि.०४.०५.२०२६
९) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०७.०५.२०२६
१०) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. आशा-४९२६/प्र.क्र. १६९/एनएचएम
११) (ई सं.क्र. १६२८१२९), दि.१८.०६. २०२६
१२) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. पूरक-२०२६/प्र.क्र.६१/ अर्थ-३, दि.०३.०७.२०२६

१३) सहसंचालक (अतांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे क्र. राआअ/राज्य शासन-निधी/मागणी प्रस्ताव/१०६६८३-६८७/२६, दिनांक ०३.०८.२०२६

## प्रस्तावना :-

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्यात आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक कार्यरत आहेत. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना, निकष व दराप्रमाणे राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत प्रकल्प अंमलबजावणी आराखडयात मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांना राष्ट्रीय आरोग्य अभियानात नेमून दिलेल्या सेवांकरीता केंद्र शासनाने निर्धारित केल्याप्रमाणे प्रोत्साहनात्मक मोबदला दिला जातो. तथापि, राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रम व इतर राष्ट्रीय आरोग्य विषयक कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांना सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीत अंदाजपत्रकातून निधी रु.४३०००.०० लक्ष तसेच पावसाळी अधिवेशनात पुरक मागणी निधीतून रु.४५०००.०० लक्ष राज्य शासनाकडून मंजूर झाले आहे. त्यास अनुसरुन वित्त विभागाने दिलेल्या मान्यतेनुसार माहे ऑगस्ट,२०२६ ते ऑक्टोबर, २०२६ या माहिन्याचे रु.२५८००.०० लक्ष इतके मानधन वितरीत करण्यास मान्यता दिली आहे. त्या अनुषंगाने आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांचे माहे ऑगस्ट,२०२६ ते ऑक्टोबर, २०२६ या माहिन्याचे मानधन वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :-

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांना मोबदला अदा करण्यासाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीत अंदाजपत्रकातून निधी रु.४३०००.०० लक्ष इतके अनुदान तसेच पावसाळी अधिवेशनात पुरक मागणी निधीतून रु.४५०००.०० लक्ष राज्य शासनाकडून मंजूर झाले आहे. त्यास अनुसरुन वित्त विभागाने दिलेल्या मान्यतेनुसार माहे ऑगस्ट,२०२६ ते ऑक्टोबर, २०२६ या माहिन्याचे रु.२५८००.०० लक्ष इतके मानधन आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांना लेखाशिर्ष २२१०H०१५, ३१-सहायक अनुदाने (वेतनेत्तर) मधून उपलब्ध करुन देण्याबाबत या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त अनुदानासाठी प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी याबाबतचे देयक कोषागारात सादर करून विहित केलेल्या बाबींवर खर्च करण्यासाठी सदर रक्कम आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी यांच्याकडे सुपुर्द करावी. यासाठी सह संचालक (अ. व प्र.), आरोग्य सेवा, मुंबई यांना “नियंत्रण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर प्रस्तावावरील खर्च खालीलप्रमाणे नमूद लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०२६-२७ साठी मंजूर करण्यात आलेल्या उपलब्ध तरतूदीतून भागविण्यात यावा.

| अ. क्र. | तपशिल | (रु.लाखात) | | |
|---|---|---|---|---|
| | | लेखाशिर्ष | अर्थसंकल्पिय तरतुद सन २०२६-२७ (मुळ+ पुरक) | वितरीत करावयाची रक्कम (राज्य हिस्सा) |
| १ | आर-१,<br>२२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य; ०६, सार्वजनिक आरोग्य;<br>१०१-रोग प्रतिबंध आणि नियंत्रण<br>०२-किमान गरजा कार्यक्रम<br>(०२) (०१) आशा स्वयंसेविका व आशा गटप्रवर्तक यांना प्रोत्साहन (कार्यक्रम)<br>३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) | २२१०H०१५ | ८८०००.०० | २५८००.०० |

उपरोक्त विवरणपत्रातील वितरीत करावयाच्या मानधनापैकी ऑगस्ट, २०२६ या माहिन्यासाठी रुपये ८६००.०० लक्ष त्वरीत वितरीत करण्याची कार्यवाही अर्थसंकल्प व लेखा शाखा, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी करावी तसेच सप्टेंबर व ऑक्टोबर, २०२६ या महिन्यांचे मानधन रु. ८६००.०० लक्ष अनुक्रमे त्या-त्या महिन्यांच्या १५ तारखेस वितरीत करण्यात यावे.

४. वित्त विभागाच्या दिनांक ०९.०४.२०२६ च्या शासन परिपत्रका सोबत जोडलेल्या परिशिष्टातील अनु.क्र.९ मधील मुद्दा क्र.१ ते ९ मधील अटी व शर्तींची पूर्तता केली असल्याचे कार्यक्रम प्रमुख / संचालक (वित्त व लेखा), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी शासनास

कळविले असून त्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे सदरहू प्रकरणी वित्त विभागाच्या दिनांक ०९.०४.२०२६ च्या शासन परिपत्रकाच्या परिशिष्ठातील मुद्दा क्र.१ ते ९ मधील अटींची पूर्तता झाली असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक मुंविनि/-२०२२/प्र.क्र.-२७/२०२२/विनियम, दिनांक १२.०१.२०२३ मधील नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून निधी वितरीत करण्यात येत आहे.

५. यापुर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने राज्य आरोग्य सोसायटीच्या लेखापरिक्षणामध्ये कोणतेही गंभीर आक्षेप घेतलेले नाहीत.

६. सदर अनुदान बिनशर्त आहे.

७. प्रस्तुत शासन निर्णय वित्त विभाग परिपत्रक दिनांक ०९.०४.२०२६ दि. ०७.०५.२०२६ व दि.०३.०७.२०२६ तसेच, वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. अनौसं .५७२/२०२६/व्यय-१३, दि.१९.०८.२०२६ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८२०१७०८०३३११७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANIL VITHALRAO SAWARE

Digitally signed by ANIL VITHALRAO SAWARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Public Health Department,
2.5.4.20=073348B7A8767F0F7865422DF1E65CE2F3BCDF6786E4712E2C088A9AC4FFEE3F, postalCode=400032,
st=Maharashtra,
serialNumber=1C7875BFBCCDB94828A5028954F06ED28EC75FD43053DB3AE8254FA5A5D14A57, cn=ANIL VITHALRAO SAWARE
Date: 2026.08.20 19:24:51 +05'30'

(अनिल वि. सावरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
२. महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
३. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
४. संचालक (रुग्णालये), आरोग्य सेवा आयुक्तालय , मुंबई.
५. संचालक (प्राथमिक), आरोग्य सेवा , पुणे.
६. संचालक, (वित्त व लेखा), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
७. अति. संचालक, कुटुंब कल्याण कार्यालय, पूणे
८. सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे .
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
११. नियोजन विभाग(का-१४७२), मंत्रालय, मुंबई.
१२. वित्त विभाग ( अर्थसंकल्प)/व्यय-१३, मंत्रालय, मुंबई
१३. अवर सचिव, (अर्थसंकल्प व लेखा), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. निवडनस्ती (एनएचएम) ...